नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १८२ Issue - 182 | वार शनिवार दि. २२ नोव्हेंबर २०२५ Blow- Saturday Date 22 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## कामगार कायद्यात ४ नवे कायदे लागू

### २९ जुने कायदे रद्द; एका वर्षाच्या नोकरीवर मिळणार ग्रॅच्युइटी, नवीन कामगार कायदा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: सरकारने कामगार कायद्यात मोठे बदल केले असून २१ नोव्हेंबर पासून हे बदल देशभरात लागू झाले आहेत. केंद्रीय कामगार कल्याण मंत्रालयाने २९ कायद्यांना केवळ ४ कायद्यांमध्ये रूपांतरित केले आहे. कामगार कल्याण मंत्रालयानुसार, या नवीन कायद्यांनुसार देशातील काम गारांना ज्यात असंघटित क्षेत्रातील कामगार, गिग वर्कर्स, स्थलांतरित मजूर आणि महिलांचा समावेश आहे, त्यांना चांगला पगार, सामाजिक सुरक्षा आणि आरोग्य-सुरक्षेची हमी मिळेल. कामगार कायद्यांमधील सुधारणांमध्ये एक महत्त्वाचा बदल हा ग्रेच्युटीसंबंधी आहे. या अंतर्गत आता एक वर्ष नोकरी केल्यासही ग्रॅच्युइटीचा लाभ मिळणार आहे.

या सुधारणांमधील एक महत्त्वाचा बदल ग्रॅच्युइटीशी संबंधित आहे. या नवीन नियमांनुसार, फिक्स्ड टर्म कर्मचाऱ्यांना आता पाच वर्षांची वाट पाहावी लागणार नाही, तर केवळ एक वर्ष काम केल्यानंतर ते ग्रॅच्युइटीसाठी पात्र ठरतील. नवीन नियमांनुसार, फिक्स्ड-टर्म कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपी कर्मचाऱ्यांप्रमाणेच सुट्ट्या, वैद्यकीय सुविधा आणि सामाजिक सुरक्षा यांसारखे सर्व फायदे मिळतील. त्यांना कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीचा पगार आणि संरक्षण मि ळेल. सरकारचा उद्देश कंत्राटी कामांना कमी करून थेट भरतीला प्रोत्साहन देणे हा आहे.

ग्रॅच्युइटी म्हणजे कंपनी आपल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या बदल्यात दिलेली एक प्रकारची भेट असते. पूर्वी ही सेवा पाच वर्षांनंतर मि ळत असे, पण आता ती एका वर्षात मिळेल. कर्मचाऱ्यांसाठी हा एक मोठा आर्थिक आधार ठरू शकतो, कारण कंपनी सोडताना किंवा निवृत्त झाल्यावर त्यांना ग्रॅच्युइटीची संपूर्ण रक्कम एकरकमी दिली जाते. देशातील सर्व कारखाने, खाणी, बंदरे तेल क्षेत्रे, रेल्वेवर पेमेंट अँड ग्रॅच्युइटी कायदा लागू होतो. यापूर्वी ग्रॅच्युइटीसाठी पात्रतेची मर्यादा पाच वर्षांवरून तीन वर्षे करण्याची शक्यता वर्तवली जात होती, परंतु सरकारने कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा देत ही मर्यादा केवळ एक वर्ष केली आहे.

नवीन कामगार कायद्यातील म हत्त्वाचे बदल

आतापासून कामगारांना नियुक्त पत्र देणे अनिवार्य असणार आहे. तसेच किमान वेतनाची अंमलबजावणी देशात केली जाणार आहे. वेळेवर पगार देणे कायदेशीर रित्या बंधनकारक केले आहे. महिलांनाही रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करण्याची परवानगी, गिगवर्कर्सना पीएफ, विमा, निवृत्ती वेतन सारख्या सुरक्षा मिळू शकणार आहेत. कामगारांसाठी मोफत वार्षित आरोग्य तपासणी केली जाणार आहे. असे अनेक बदल कामगार कायद्याद्वारे करण्यात आले आहेत.

## नितीश कुमार यांनी २० वर्षानंतर गृहमंत्रिपद सोडलं, १८ मंत्र्यांची खाती जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पाटणा : बिहारच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर नितीश कुमार यांनी दुसऱ्या दिवशी खातेवाटप जाहीर केलं आहे. नितीश कुमार यांच्यासोबत २४ जणांनी मंत्रिपदा-ची शपथ घेतली होती. गेल्या २० वर्षांपासून नितीश कुमार यांनी गृहमंत्रिपद त्यांच्याकडे ठेवलं होतं. यावेळी नितीश कुमार यांनी गृहमंत्रिपद भाजपच्या सम्राट चौधरींना दिला आहे. नितीश कुमार यांनी गेल्या २० वर्षांमध्ये सत्तेत असताना गृहमंत्रिपद आपल्याकडे ठेवलं होतं. यावेळी बिहार सरकारम धील महत्त्वाची खाती मात्र भाजपच्या नेत्यांना देण्यात आली आहेत.

महत्त्वाची खाती भाजपकडे

नितीशकुमार यांनी बिहारमधील खातेवाटप जाहीर केलं आहे. गृह मंत्रालय भाजपच्या सम्राट चौधरींकडे देण्यात आलं आहे. तर, महसूल खात्यावरही भाजपचे वर्चस्व पाहायला मिळतंय. विजय कुमार सिन्हा यांना महसूल मंत्रिपद देण्यात आलं आहे. आरोग्य , कायदा , कृषी , उद्योग , सहकार , मागासवर्गीय कल्याण , अनुसूचित जाती जमाती , नगरविकास भाजपकडे देण्यात आली आहेत.

लोक जनशक्ती पार्टी रामविलास पक्षाकडे ऊस उद्योगाहस सार्वजनिक आरोग्य नियंत्रण विभाग तर जीतन राम मांझी यांच्या हम पार्टीकडे सूक्ष्म जल संधारण खातं देण्यात आलं आहे. उपेंद्र कुशवाह यांच्या पक्षाला पंचायत राज विभाग सोपवण्यात आला आहे.

नितीश कुमार यांच्या मंत्रिमंडळात २४ जणांनी मंत्रिपदा-ची शपथ घेतली होती. आतापर्यंत १८ जणांची खाती जाहीर करण्यात आली आहेत. तर, ६ मंत्र्यांची खाती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाहीत. यावरुन राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहेत.

उपमुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा यांच्याकडे म हसूल आणि खनिकर्म मंत्रालय देण्यात आलं आहे. भाजपच्या मंगल पांडे यांना आरोग्य आणि विधी व न्याय खातं दिलं गेलं आहे. दिलीप जयस्वाल यांना उद्योग खातं देण्यात आलं आहे. नितीन नवीन यांना नगर विकास आणि रस्ते विकास खातं देण्यात आलं आहे. रामकृपाल यादव यांना कृषी खातं देण्यात आलं आहे. संजय टायगर यांना श्रम संसाधन खातं देण्यात आलं आहे. अरुण शंकर यांना पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य, युवक विभाग, सुरेंद्र मेहता यांना पशुसंवर्धन आणि मत्स्य, नारायण प्रसाद यांना आपत्ती व्यवस्थापन, रमा निषाद यांना ओबीसी आणि ईबीसी कल्याण, लखेद पासवान यांना अनूसुचित जाती आणि अनूसुचित जमाती कल्याण, श्रेयसी सिंह यांना माहिती तंत्रज्ञान आणि क्रीडा, प्रमोद चंद्रवंशी यांना सहकार, पर्यावरण, वन वातावरणीय बदल खातं दिलं गेलं आहे.

## एकनाथ शिंदे आणि फडणवीस यांच्यात दुरावा? शिंदेंची नाराजी कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नाराजीच्या चर्चा सातत्याने समोर येत आहेत. एकनाथ शिंदे आणि त्यांच्या मंत्र्यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीत शिवसेनेच्या मंत्र्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नाराजी व्यक्त केली. यानंतर एकनाथ शिंदे हे दिल्ली दौऱ्यावर गेले. त्यांनी दिल्लीत जावून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत एकनाथ शिंदे यांनी आपली नाराजी मांडल्याची चर्चा आहे. पण तरीही एकनाथ शिंदे यांची नाराजी दूर झाली नसल्याची चर्चा आहे. या चर्चांना उधाण येण्यामागचं कारण म्हणजे आजच्या कार्यक्रमात शिंदे आणि फडणवीस यांची देहबोली.


मुंबईत एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सम ोरासमोर आले. यावेळी दोन्ही नेत्यांनी एकमेकांशी एकमेकांना नमस्कार केला. पण दोघांम ध्ये कोणताही संवाद झाला नाही. एरव्ही एकमेकांच्या बाजूला असताना हसत-खेळत राहणारे देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे या दोन्ही नेत्यांची देहबोली आज थोडीशी अवघडल्यासारखी बघायला मिळाली. त्यामुळे दोन्ही नेत्यांच्या देहबोलीची सध्या राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. तसेच एकनाथ शिंदे यांची नाराजी किती दिवस राह-ते? त्यांची नाराजी दूर करण्यात भाजपला यश येतं का? ते पाहणं महत्त्वाचंदेखील आता महत्त्वाचं आहे.



विशेष म्हणजे बिहारच्या नव्या सरकारच्या शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तीनही नेते उपस्थित होते. यावेळी देखील एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात फारसा संवाद झालेला बघायला मि ळाला नाही. विशेष म्हणजे या शपथविधीसाठी जाताना देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी एकत्र प्रवास केला तर एकनाथ शिंदे यांनी एकट्याने प्रवास केल्याची माहिती आहे. तसेच शपथविधी सोहळा आटोपल्यानंतर एकनाथ शिंदे हे एकटेच परत आल्याचं समोर आलं आहे. पण अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस हे सोबत आल्याची माहिती आहे. 'एबीपी माझा'ने याबाबत वृत्त दिलं आहे. याशिवाय १८ नोव्हेंबर २०२५ ला राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली होती. या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे मंत्रालयातून बाहेर पडले तेव्हा त्यांची देहबोली ही नाराज असल्याची भासत असल्याचं काहींचं म्हणणं होतं. त्या दिवसापासूनची त्यांची नाराजी अद्यापही तशीच असल्याची चर्चा आहे.

## तेजस लढाऊ विमान कोसळलं; पायलटचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : दुबई एअर शोमध्ये भारतीय बनावटीचे तेजस लढाऊ विमान (ढशक्षरी ऋळसहींशी गर्शी उीरीह) कोसळले. वृत्तसंस्था एप-ीनुसार, स्थानिक वेळेनुसार दुपारी २:१० वाजता डेमो फ्लाइट दरम्यान हा अपघात झाला. पायलटने बाहेर पडण्याचा प्रयत्न केला की नाही हे स्पष्ट नाही. अपघातानंतर विमान-तळावर भयावह स्फोट झाला. हवाई दलाच्या तेजस जेट विमान अपघाताची ही दुसरी घटना आहे. यापूर्वी, २०२४मध्ये, राजस्थानमधील पोखरण येथे एका युद्धाभ्यास दरम्यान इंजिन बिघाडामुळे तेजस विमान कोसळले होते.

दुबई एअर शो हा आंतरराष्ट्रीय विमानांचे प्रदर्शन आहे. प्रमुख एरोस्पेस कंपन्या, विमान कंपन्या, हवाई दल आणि तंत्रज्ञान कंपन्या त्यांचे नवीनतम विमान, हेलिकॉप्टर, शस्त्रास्त्र प्रणाली आणि एरोस्पेस तंत्रज्ञान प्रदर्शित करतात. दुबई एअर शो १९८९ मध्ये सुरू झाला आणि दुबईच्या अल मकतूम आंतरराष्ट्रीय विमानतळावर दर दोन वर्षांनी आयोजित केला जातो. तेजसने सहभागी होण्याचे हे सलग तिसरे वर्ष आहे.

या अपघातानंतर, भारतीय हवाई दलाने लढाऊ विमान अपघाताचे कारण शोधण्यासाठी कोर्ट ऑफ इन्क्वायरी स्थापन केली आहे. हवाई दलाच्या तेजस जेटशी संबंधित ही दुसरी घटना आहे. यापूर्वी, २०२४ मध्ये, राजस्थानमधील पोखरण येथे एका युद्धादरम्यान इंजिन बिघाडामुळे तेजस जेट कोसळले होते. कोर्ट ऑफ इन्क्वायरी ही एक औपचारिक चौकशी समिती आहे जी तिन्ही सशस्त्र दलांशी संबंधित कोणत्याही गंभीर घटनेचे, विमान अपघाताचे, अपघाताचे, मृत्यूचे किंवा ऑपरेशनल लॅप्सचे मूळ कारण निश्चित करण्यासाठी स्थापन केली जाते. कोर्ट ऑफ इन्क्वायरी फक्त चौकशी करते. जर कोणी दोषी आढळले तर वेगळ्या प्रक्रियेद्वारे पुढील कारवाई केली जाते.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २५ नोव्हेंबर २०२२ रोजी बेंगळुरूमध्ये तेजस लढाऊ विम ानातून भरारी घेतली होती. उडवले. भारतीय पंतप्रधानांनी लढाऊ विमानातून केलेले हे पहिले उड्डाण होते. तेजस उड्डाण करण्यापूर्वी, मोदींनी बेंगळुरूमधील हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड ला देखील भेट दिली.

### सेमी फायनल गमावण्याची नामुष्की, बांगलादेशने हरवले

## भारताचा सुपर ओव्हरमध्ये लाजीरवाणा पराभव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




दोहा : भारताला आशिया कप रायझिंग कप स्पर्धेच्या सेमी फायनलमध्ये लाजीरवाण्या पराभवाचा सामना करावा लागला. हा सामना सुपर ओव्हरमध्ये पोहोचला होता. पम सुपर ओव्हेरमध्ये भार-ताला एकही धाव करता आली नाही. त्यामुळे बांगलादेशला विजयासाठी एका धावेची गरज होती. बांगलादेशला ही धाव वाईडच्या रुपात मिळाली आणि त्यांनी विजय साकारत अंतिम फेरीत दिम ाखात प्रवेश केला. बांगलादेशने या साम न्यात प्रथम फलंदाजी करताना १९४ धावा केल्या होत्या. बांगलादेशच्या या आव्हानाचा पाठलाग करताना वैभव सूर्यवंशीने भारताला झंझावातील सुरुवात करून दिली. त्यानंतर भारताचे फलंदाज एकामागून एक बाद होत गेले. अखेरच्या चेंडूवर चार धावांची गरज असताना भारताने तीव धावा काढल्या आणि सामना सुपर ओव्हरमध्ये गेला. पण सुपर ओव्हरमध्ये भारताला एकही धाव करता आली नाही आणि त्यांचे आव्हान संपुष्टात आले.

बांगलादेशच्या १९५ धावांचा पाठलाग करताना भारताला वैभव सूर्यवंशीने तुफानी सुरुवात करून दिली वैभवने यावेळी बांगलादेशच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. पहिल्या षटकापासून तो बांगलादेशच्या गोलंदाजांवर तुटून पडला होता. पण वैभवला यावेळी मोठी खेळी साकारता आली नाही. कारण एक मोठा फटका मारण्याच्या नादात त्याने आपली विकेट गमावली. वैभवने यावेळी १५ चेंडूंत २ चौकार आणि चार षटकारांच्या जोरावर ३८ धावांची खेळी साकारली. वैभव बाद झाला आणि त्यानंतर प्रियांश आर्याने सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली. प्रियांशने यावेळी २३ चेंडूंत ४ चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ४४ धावा केल्या. भारताच्या दोन्ही सलामीवीरांनी आपले काम चोख बजावले होते. पण त्यानंतर भार-ताला नमन धीरच्या रुपात अजून एक धक्का बसला आणि त्यामुळे संघाचा डाव अडचणीत आला.

भारताचा कर्णधार जितेश शम ने यावेळी संघाला सावरण्याचा प्रयत्न केला, पण तो मोक्याच्या क्षणी आपली विकेट बहाल करून परतला. पण नेहाल वढेराने त्यानंतर भारताचा किल्ला लढवला. नेहालला यावेळी चांगली साथ मिळाली ती रमणदीप सिंगची. या दोघांनी भारतासाठी चांगला किल्ला लढवला. पण रमणदीप सिगं यावेळी १७ धावांवर बाद झाला आणि नेहालवरील दडपण वाढले.

तत्पूर्वी, भारताने टॉस जिंकला आणि बांगलादेशला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. बांगलादेशने या संधीचा चांगला फायदा उचलला. बांगलादेशचा सलामीवीर हबिबूल रहमान सोहनने यावेळी ६५ धावांची दमदार खेळी साकारली आणि संघाला मोठी धावसंख्या उभारून देण्यात मोलाचा वाटा उचलला. अखेरच्या षटकांमध्ये मेहेरॉबने फक्त १८ चेंडूंत ४८ धावा फटकावल्या आणि त्यामुळेच बांगलादेशला १९४ धावांचा डोंगर उभारता आला.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक



प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.
फक्त आमच्या कडेच

मतदार स्लिप
नांव व मतदान केंद्रासहीत
फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### अभिनव बदल

सरकारने देशभरात कामगार कायद्यात मोठे बदल केले असून २१ नोव्हेंबर पासून हे बदल लागू झाले आहेत. केंद्रीय कामगार कल्याण मंत्रालयाने २९ कायद्यांना केवळ ४ कायद्यांमध्ये रूपांतरित केले आहे. कामगार कल्याण मंत्रालयानुसार, या नवीन कायद्यांनुसार देशातील कामगारांना ज्यात असंघटित क्षेत्रातील कामगार, गिग वर्कर्स, स्थलांतरित मजूर आणि महिलांचा समावेश आहे, त्यांना चांगला पगार, सामाजिक सुरक्षा आणि आरोग्य-सुरक्षेची हमी मिळेल. कामगार कायद्यांमधील सुधारणांमध्ये एक महत्त्वाचा बदल हा ग्रेच्युटीसंबंधी आहे. या अंतर्गत आता एक वर्ष नोकरी केल्यासही ग्रॅच्युइटीचा लाभ मिळणार आहे. या सुधारणांमधील एक महत्त्वाचा बदल ग्रॅच्युइटीशी संबंधित आहे. या नवीन नियमांनुसार, फिक्स्ड टर्म कर्मचाऱ्यांना आता पाच वर्षांची वाट पाहावी लागणार नाही, तर केवळ एक वर्ष काम केल्यानंतर ते ग्रॅच्युइटीसाठी पात्र ठरतील. नवीन नियमांनुसार, फिक्स्ड-टर्म कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपी कर्मचाऱ्यांप्रमाणेच सुट्ट्या, वैद्यकीय सुविधा आणि सामाजिक सुरक्षा यांसारखे सर्व फायदे मिळतील. त्यांना कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीचा पगार आणि संरक्षण मिळेल. सरकारचा उद्देश कंत्राटी कामांना कमी करून थेट भरतीला प्रोत्साहन देणे हा आहे. ग्रॅच्युइटी म्हणजे कंपनी आपल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या बदल्यात दिलेली एक प्रकारची भेट असते. पूर्वी ही सेवा पाच वर्षांनंतर मिळत असे, पण आता ती एका वर्षात मिळेल. कर्मचाऱ्यांसाठी हा एक मोठा आर्थिक आधार ठरू शकतो, कारण कंपनी सोडताना किंवा निवृत्त झाल्यावर त्यांना ग्रॅच्युइटीची संपूर्ण रक्कम एकरकमी दिली जाते. देशातील सर्व कारखाने, खाणी, बंदरे तेल क्षेत्रे, रेल्वेवर पेमेंट अँड ग्रॅच्युइटी कायदा लागू होतो. यापूर्वी ग्रॅच्युइटीसाठी पात्रतेची मर्यादा पाच वर्षांवरून तीन वर्षे करण्याची शक्यता वर्तवली जात होती, परंतु सरकारने कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा देत ही मर्यादा केवळ एक वर्ष केली आहे. आतापासून कामगारांना नियुक्त पत्र देणे अनिवार्य असणार आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक आणि प्रसार माध्यम कक्ष कार्यपद्धती

**भाग तीन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोकशाही अधिक बळकट करण्याकरिता लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून प्रसारमाध्यमांची भूमिका महत्वाची आहे. निवडणुकांमध्ये माध्यमांचे महत्वपूर्ण भमिका लक्षात घेता त्यांना निवडणुकीच्या काळात माध्यम कक्ष (मीडिया सेंटर), प्रसार माध्यम प्रतिनिधीं व कॅमेरामन यांना मतदान केंद्रात किंवा मतमोजणी केंद्रात प्रवेशाकरिता प्रवेशिका, एकूणच निवडणूक प्रक्रियेविषयी जबाबदारीपूर्वक माहिती देण्यात येते, याबाबत माहिती देणारा लेख पुढीलप्रमाणे:

माध्यम कक्ष: प्रसारमाध्यमांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात एकत्रित स्वरूपात माहिती उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर संबंधित जिल्हाधिकारी माध्यम कक्षाची स्थापना करतील. माध्यम कक्षाद्वारे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना वेळोवेळी निवडणूकविषयक अद्ययावत माहिती वेळोवेळी मिळेल, याची संबंधित जिल्हाधिकारी विशेष दक्षता घेतील.

माध्यम कक्षामध्ये प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसाठी पुरेशी आसन व्यवस्था, इंटरनेटची सुविधा इत्यादी बाबी असतील याची दक्षता घेतील. माध्यम कक्षाची जबाबदारी सांभाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संबंधित जिल्हा माहिती अधिकारी किंवा अन्य अधिकाऱ्याची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात येईल. जिल्हाधिकारी यांनी प्रसंगी स्वतः वेळोवेळी पत्रकार परिषदा घेऊन किंवा प्रसिद्धिपत्रकाद्वारे प्रसारमाध्यमांना निवडणूकविषयक माहितीबाबत अवगत करण्यात येते आणि मतदार जागृतीसाठी प्रसारमाध्यमांनीदेखील स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसाठीः कायदा व सुव्यवस्थेच्यादृष्टीने संबंधित मतदार, अधिकारी, कर्मचारी व इतरांना परवानगीशिवाय मतदान केंद्रात किंवा मतमोजणी केंद्रात प्रवेश करण्यास मनाई असते. त्यामुळे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनादेखील प्रवेशिकेशिवाय प्रवेश करता येणार नाही. नगरपरिषदा, नगरपंचायती सार्वत्रिकांसाठी जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या यांच्या मान्यतेने प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान व मतमोजणी केंद्रांवर प्रवेशासाठी प्रवेशिका देण्यात येतील.

ऐनवेळी होणारी धावपळ व गोंधळ टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर मतदान केंद्र व मतमोजणी केंद्रावर प्रवेशासाठी द्यावयाच्या प्रवेशिकांकरिता प्रसारमाध्यम संस्थेकडून पुरेशा वेळेपूर्वी अर्ज मागविण्यात येणार आहे. अर्जासोबत पासपोर्ट आकाराच्या छायाचित्राच्या दोन प्रती देणे आवश्यक राहील. प्रसारमाध्यम संस्थेकडून प्राप्त झालेल्या अर्जाची योग्यरीत्या छाननी करून पात्र प्रतिनिधीलाच प्रवेशिका देण्यात येईल.

पुढीलप्रमाणे प्रवेशिका देण्यात येतीलः राज्य शासनाच्या यादीवरील 'अ' (मोठे), 'ब' (मध्यम) आणि 'क' (लघु) वर्गातील दैनिक वृत्तपत्राच्या प्रत्येकी दोनच प्रतिनिधींना प्रवेशिका दिल्या जातील. राज्य शासनाच्या यादीवरील साप्ताहिकाच्या एका प्रतिनिधीलाच प्रवेशिका देण्यात येईल. उपग्रह वाहिन्यांच्या प्रत्येकी दोन प्रतिनिधींना आणि एका कॅमेरामन तसेच भारतीय टपाल खात्याचा परवाना असलेल्या केबल वाहिनीच्या एका प्रतिनिधीला आणि एका कॅमेरामनलाच प्रवेशिका दिली जाईल. प्रवेशिकांची ही संख्या प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी स्वतंत्र 'युनिट' म्हणून विचारात घेतली जाईल. प्रवेशिकांची संख्या कमी किंवा जास्त करण्याचा अधिकार अपवादात्मक स्थितीत आणि सबळ कारणांच्या आधारे जिल्हाधिकारी यांना आहेत. या व्यतिरिक्त (उदा. यूट्यूब चॅनल, ऑनलाईन वृत्तपत्र, संकेतस्थळ, सोशल मीडिया हँडल आदींना) कुठल्याही प्रतिनिधीला किंवा कॅमेरामनला प्रवेशिका देण्यात येणार नाही.

कुठल्याही मतदान केंद्रावर किंवा मतमोणजी केंद्रावर प्रवेशासाठी शासकीय प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनादेखील (उदा. पीआयबी, डीजीआयपीआर आदी) प्रवेशिकेशिवाय प्रवेश करता येणार नाही. 'मतदान केंद्र आणि मतमोजणी केंद्रावरील प्रवेशासाठी' असा स्पष्ट उल्लेख प्रवेशिकेवर असलेल्या प्रतिनिधींना प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेशिका देताना नोंदवहीत (रजिस्टर) संबंधित प्रसारमाध्यम प्रतिनिधींच्या नावाची आणि संपर्क क्रमांकासह संपूर्ण पत्त्याची नोंद घेतल्याची खात्री करणे, हे संबंधित अधिकाऱ्यास अनिवार्य असेल तसेच भविष्यातील संदर्भासाठी नोंदवहीवर (रजिस्टर) संबंधित प्रतिनिधीचे छायाचित्रदेखील चिकटवावे. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना दिलेली प्रवेशिका रद्द करण्याचे अधिकार यथास्थिती जिल्हाधिकारी अथवा निवडणूक निर्णय अधिकारी अथवा राज्य निवडणूक आयोगास आहेत. कुठल्याही माध्यम प्रतिनिधीने प्रवेशिकेसाठी थेट राज्य निवडणूक आयोगाकडे अर्ज करू नये. अशा अर्जाचा राज्य निवडणूक आयोग विचार करणार नाही. ते अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील.

मतदान व मतमोजणी केंद्रावरील दक्षताः संबंधित अधिकारी, कर्मचारी प्रवेशिकेची उचित पडताळणी करूनच प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान, मतमोजणी केंद्रावर प्रवेश देतील. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना थेट मतदान केंद्रावरील मतदान कक्षाजवळ जाऊन पाहणी किंवा छायाचित्रण करता येणार नाही तसेच मतदान कक्षाचे छायाचित्रेही घेता येणार नाही.

शांततापूर्ण व शिस्तबद्ध मतदान प्रक्रियेत बाधा पोहचेल, असे कुठलेही वर्तन करता कामा नये. मतदार मतदान करतानाचे छायाचित्र किंवा छायाचित्रण पुरेशा अंतरावरून करणे बंधनकारक असेल. ते करतानाही मतदानाच्या गोपनियतेच्या हक्काचे उल्लंघन होता कामा नये. कुठल्या मतदाराने कोणत्या उमेदवाराला मतदान केले आहे, हे मतदानाच्या वेळी किंवा मतमोजणीप्रसंगी अपघाताने चित्रित झाल्यास किंवा त्याचे छायाचित्र काढल्यास त्याचे प्रसारण किंवा प्रसिद्धी करता येणार नाही.

प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान, मतमोजणी केंद्रावर छायाचित्रासाठी किंवा छायाचित्रणासाठी कॅमेराचे स्टँड घेवून जाता येणार नाही. केवळ राज्य निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रियेसाठी नेमलेल्या अधिकृत छायाचित्रकार किंवा कॅमेरामन यांनाच मतदान केंद्रात व मतमोजणी केंद्रात कॅमेरा स्टँड नेता येईल. मतदान किंवा मतमोजणी केंद्रावर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींची एकाच वेळी होणारी गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार गटागटाने सर्वांना आत सोडण्याबाबतचे किंवा परिस्थितीनुरुप नियोजन करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष यांना आहेत.

मतमोजणी केंद्रावरील सुविधा: जिल्हाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे असलेल्या यादीतील अधिकृत प्रवेशपत्रधारक प्रसारमाध्यम प्रतिनिधीलाच मतमोजणी केंद्रात प्रवेश दिला जाईल. प्रसारमाध्यम प्रतिनिधींसाठी मतमोजणी केंद्रातच स्वतंत्र पत्रकार कक्षाची व्यवस्था केली जाईल. त्यांना इतरत्र कुठेही फिरण्याची अनुमती नसेल. मतमोजणी केंद्रावरील गोंधळ टाळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ किंवा सुरक्षा व्यवस्था करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी अथवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची असेल. पत्रकार कक्षामध्ये फेरीनिहाय मतमोजणीचे तपशील प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात येतील. मतमोजणी केंद्राच्या बाहेरदेखील कर्णाच्या (लाऊड स्पीकर) माध्यमातून किंवा मोठ्या पडद्यावर (स्क्रीन) फेरीनिहाय तपशील आणि अंतिम स्वरुपाचे निकाल सर्वांच्या माहितीसाठी शक्य असेल तिथे उपलब्ध करून दिले जातील.

निवडणुका सुरळीत व सुव्यवस्थित पार पाडण्याच्यादृष्टीने प्रसारमाध्यमांच्या भूमिका महत्वाची आहे, त्यामुळे आदर्श आचारसंहितेचे पालन करुन निवडणूक यंत्रणांना सहकार्य करावे.

**– संकलन: जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# एजाज हुसेन मुजावर नाही रे वर्गाची पत्रकारिता करणारा पत्रकार हरपला

## सांस्कृतिक पत्रकारितेचा एक पाया गमविला (ग्रामीण महाराष्ट्राची तीव्र सहवेदना)

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्रातील पत्रकारिता आणि बातमीदारी ही एकत्रित मिसळली आहे ही प्रसंगा अनुरूप रूप धारण करते आणि निष्पक्षतेचा कार्याचा गवगवा करते पत्रकारितेत वर्तमानपत्रात सामाजिक संमिश्रता खूप महत्त्वाची असते पत्राचा चेहरा संपादक असतो धोरणे आणि उद्दिष्टे ही असतात पण तळातील बातमीदार जितका जात विहीण धर्मवीहीन असेल तितका त्या वर्तमान पत्राचा चेहरा आरशामध्ये स्वच्छ निकोप दृष्टिकोन म्हणून वाचकाला पहावयास मिळतो ९० च्या दशकापासून २०१० पर्यंत प्रादेशिक व स्थानिक वर्तमानपत्रात अशा भिन्न भिन्न सामाजिक स्थरातील जातीय व धार्मिक गटातील बातमीदार यांनी मोठे योगदान दिले आहे त्यांच्याच श्रमातून घामातून वर्तमानपत्रे तट्ट फुगली आहेत रुजली आहेत मोठी झाली आहेत आणि या छोट्या बातमीदारांना त्यांनी रेव्हेन्यू गोळा करण्यासाठी आता कामाला झोपले आहे असंख्य पुरवण्यात असंख्य वाढदिवस आणि गुन्हेगारांच्या दारात जाऊन हेलपाटे घेऊन जाहिराती मागणी वाढदिवसाच्या पुरविण्याची अंदाजपत्रके देणे हे काम आता बातमीदार नव्हे तर उपसंपादकालाही करावे लागते हा महाराष्ट्राचा पत्रकारितेचा निर्देशांक खूप खाली घसरला आहे याचे दुःख सर्वांनाच आहे वाचक म्हणून हे दुःख महाराष्ट्रातील वाचक बाळगतील तेव्हा खऱ्या अर्थाने वाचन व वाचक साक्षरतेकडे निघाले आहे वस्तुनिष्ठ ते कडे ते जात राहील आणि तळातील राबणाऱ्या कष्ट घेणाऱ्या निष्पक्षपाती बातमीदारांच्या योगदानाची जाणीव ग्रामीण महाराष्ट्राच्या वाचकांना होत राहील तो दिवस यायला हवा तोपर्यंत वाट पाहायला हवी मात्र आयुष्यातील तीन दशके ज्यांनी ग्रामीण पत्रकारितेत घालवली असे पत्रकार आठवले म्हणजे त्यांच्या कष्टाची त्यांच्या वेळेची महती पटते त्यांनी सोसलेले कष्ट त्रास हे सगळे आठवते म्हणूनच बातमीदार पत्रकाराचा मृत्यू ही मोठी वेदनादायक सामाजिक संचिताच्या दृष्टीने गोष्ट असते.

सोलापूरचा एजाज हुसेन मुजावर २० नोव्हेंबर २०२५ रोजी अचानक गेल्याचे कळाले तीव्र दुःख झाले संवेदनात जाती आणि धर्माच्या पलीकडचे असली तर ती परिघावर जाते ती दूरवर पोहोचते. असेच काहीसे या तीव्र दुःखाबद्दल वाटून राहिले म्हणून ही सहवेदना

महाराष्ट्रातील पत्रकारितेचा चेहरा हा कधी स्पष्ट होत नाही मोठे संपादक उपसंपादक हे तर प्रगतीकता आणि संकीर्णता खुलेपणा आणि अंतर्गतता ही दोन्हीही बाळगून काम करताना आढळतात



एजाज हुसेन मुजावर हा सोलापूर स्थित जिल्हा प्रतिनिधी खूप दखलपात्र बातमीदार होता निष्पक्ष होता तो राजकीय आणू नय पत्रकारिता करत नव्हता मोठ्या वर्तमानपत्रात सुद्धा मस्टर पेरोलवर राजकीय नेत्यांच्या साखर कारखानदारांच्या सभोवताली असणारे असंख्य पत्रकार महाराष्ट्रात आज आहे पण बड्या नेत्यांच्या जवळ जाऊन उंची कमी करून घेणारा हा पत्रकार कष्टकरी बिडी कामगार कष्टकऱ्यांचे लढे त्यांचे मोर्चे त्यांची उपोषणे त्यांचे कार्यक्रम याचे वार्तांकन करणारा हा बातमीदार पत्रकार यासाठी खूप महत्त्वाचा होता अनेक वर्तमानपत्रांमध्ये नाही रे वर्गांचा आवाज आता उठत नाही मात्र सोलापूर जिल्ह्यातील नाही रे वर्गाचे वार्तांकन करणारा एजाज हुसेन मुजावर हा जाणिवेचा पत्रकार होता हे जवळून अनुभवले आहे वाचले आहे प्रत्यक्ष बोलण्यातून अनेक वेळा त्याची प्रचिती आली आहे

आपल्या पत्रकारितेचा वापर आपल्या जाहिराती आपल्या जाहिरात कंपन्या व्यवसाय आणि मोठी टेंडर कामे मिळवणारे मोठे पत्रकार खूप पाहिले आहेत आता तर पत्रकार बिल्डर ठेकेदार आणि मंत्र्यांचे पिआरोआणि रिवाल्वर बाळगणारे मोठे साहित्यिक झाले आहेत जेसीबी बाळगणारे वाळू ठेकेदार हे पत्रकारांचे सर्रास आता जगण्याचे उद्योग उघड आहेत मात्र तब्बल ३० वर्षाच्या पत्रकारितेत एजाज हुसेन मुजावर यांनी या वाटेवरून चालणे कधीच मान्य केले नाही याचेच मोठे आश्चर्य वाटते.

कष्टकऱ्यांच्या बातम्या साहित्यिक सांस्कृतिक बातम्या निष्पक्ष बातम्या व बातम्या किल न करणारा हा पत्रकार म्हणूनच तळातील अल्पसंख्यांक समाजातील असूनही मोठा योगदान देऊन गेला आहे याची कृतज्ञ जाणीव समाजाला प्रसार माध्यमांना आहे असली पाहिजे महानगरीय पत्रकारिता मंत्रालयीन पत्रकारिता आणि मंत्र्यांची पत्रकारिता साखर कारखानदारांची पत्रकारिता कलेक्टर आणि एस पी ची पत्रकारिता असे पत्रकारितेचे नवे गट आता तयार झाले आहेत याची साक्षरता जनतेला कळेल तेव्हा कळेल मात्र एजाज हा लोकसत्तेचा

निष्ठावंत पत्रकार सतत योगदान देत राहिला याची आठवण येत राहते त्याचे पत्रकारितेतील योगदान सोलापूर जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्रातील वाचक समजावून येतील आणि इजाज हुसेन मुजावर या पत्रकाराच्या स्मृतीला अभिवादन करताना मनात क्षणभर वाटून राहते योगदान नाकारणारा कालखंडाला आहे वापरा फेकून द्या हा कालखंडाला आहे अल्पसंख्यांकांना आ राष्ट्रीय ठरवण्याचा कालखंडाला आहे वरिष्ठ स्तरावरील मालक संपादक हे या तळ्यातल्या माणसांच्या कामावर अविश्वास दाखवणारा कालखंड वाढत चाललाय अशा वेळेला एजाज हुसेन मुजावर हा एक सांस्कृतिक परिपूर्ण आकलन असलेला धर्मनिरपेक्ष वार्तांकन करणारा जातीनेरपेक्ष बातम्यांना न्याय देणारा हा बातमीदार पत्रकार जाणे हे पत्रकारितेचे फार मोठे

नुकसान आहे महाराष्ट्राच्या ग्रामीण पत्रकारितेत एजाज .हुसेन मुजावर मुजावर चे योगदान ग्रामीण पत्रकारिता समजावून घेईल आणि सांस्कृतिक सम्यक पत्रकारितेचा हा लिहिता हात या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संकोच काळात निघून गेला याचे दुःख बाळगणे या पलीकडे आपल्या हाती काही नाही अभिव्यक्ती स्वातंत्र्य राहते की जाते असा कालखंडाला आहे अशा वेळेला ग्रामीण महाराष्ट्रातील समन्वयी संवेदना कृतार्थ योगदान सर्वच क्षेत्रातील सूक्ष्म भाग आणि त्याची मौलिकता ओळखून ते अक्षरबद्ध करणारा हा पत्रकार मित्र अनेकांचा चाहता होता सोबती होता मार्गदर्शक होता इ ह लोक संपून जाणे ही एक मोठी पत्रकारितेची हानी आहे त्याच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करताना लोकसत्ते त्याने दिलेले योगदान मनात वाचक जपतील ग्रामीण महाराष्ट्र जपेल कुटुंबाच्या दुःखात सहभागी होणे हेच सहवेदनेचे सुसंस्कृत कर्तव्य सर्वजण करतील हीच अपेक्षा

**– शिवाजी राऊत, सातारा**

## मंगळवेढा नगरपालिकेत सोमनाथ अवताडे बिनविरोध; मंगळवेढ्यात भाजपला पहिले यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा नगरपालिकेच्या निवडणुकीत भारत नागणे यांनी अर्ज मागे घेतल्याने भाजपचे सोमनाथ आवताडे निवडले त्यामुळे मंगळवेढा भाजपचे पहिले मिळाले आहे.

मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीत प्रभाग तीन मधून सोमनाथ तावडे यांची विनोद निवड झाली असून भाजपने पहिले यश मिळवले. उमेदवारी अर्ज माघारी नंतर नगराध्यक्ष पदासाठी तीन आणि नगरसेवक पदासाठी ५८ उमेदवार रिंगणात राहिले आहेत अर्ध माघारी या प्रकरणी दरम्यान पोलीस सुरक्षा आणि राजकीय तडजोड दिसून आल्या, काही उमेदवाराची डोळे पाणावले. दिनांक २१ नोव्हेंबर मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी प्रभाग तीन मधील तीर्थक्षेत्र विकास आघाडी मधील भारत नांगरे यांनी आपला अर्ज उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने आमदार समाधान आवताडे यांचे चुलत बंधू भाजपचे सोमनाथ आवताडे यांच्या बिनविरोध तर निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. अवताडे यांच्या बेलवरून निवडीने मंगळवेढा नगरपालिका भाजपमध्ये पहिले बिनविरोध यश संपादन केली आहे.

## सोलापूरचे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्या गाडीचा अपघात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : कोंडीजवळ माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचा कारला पुणे महामार्गावर अपघात झाला. सुदैवाने या अपघातामध्ये जगताप यांना काहीही झालेले नाही.

पुणे उपसंचालक कार्यालय सुनावणी असल्यामुळे माध्यमिक शिक्षण अधिकारी सचिन जगताप हे मंगळवारी सकाळी पुण्याकडे निघाली होती. मोहोळ मध्ये गेल्यावर त्यांच्या गाडीमध्ये दोष निर्माण झाला. त्यामुळे दुसरी कार मधून ती पुण्याकडे रवाना झाले. शेटफळ जवळ उसाच्या ट्रॉलीला कारची मागून धडक बसली व या धडके कारचा पुढील भाग चकाचूर झाला सुदैवाने शिक्षणाधिकारी जगताप या चालकांनी सीट बेल्ट असल्यामुळे एअर बॅग उघडल्या व कोणताही इतर अनुचित प्रकार झाला नाही पण धडक बसल्यानंतर बोनेटवर आढळल्यामुळे शिक्षणाधिकारी जगताप यांनी उपचार घेतले. यानंतर त्यांना रुग्णातून सुट्टी देण्यात आली सुदैवाने त्याबद्दल कोणतीही इजा झाली नाही या अपघातामुळे शिक्षणाधिकारी जगताप यांनी सुनामी लांबणीवर टाकले आहे.

# हराळी येथे जिल्हास्तरीय इन्स्पायर अवार्ड पुरस्काराचे प्रदर्शन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : विज्ञान व तंत्रज्ञान विभाग भारत सरकार , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन , राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूर , जिल्हा शिक्षण विभाग धाराशिव वतीने खपीळीश ुरीव योजने अंतर्गत पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचे (धाराशिव, लातूर, नांदेड संयुक्त) जिल्हास्तरीय इन्स्पायर अवार्ड प्रदर्शन दि १७ व १८ नोव्हें २०२५ रोजी उमरगा तालुक्यातील ज्ञानप्रबोधिनी हराळी येथे पार पडले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन धाराशिव जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांच्या हस्ते तर मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.



यावेळी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था धाराशिव प्राचार्य डॉ . दयानंद जटनुरे , शिक्षणाधिकारी (मा .) श्रीमती सुधा साळुंके मॅडम,माहिती अधिकारी विवेक खडसे ,दिल्ली येथील निरीक्षक श्रीमती शिवानी सिंग व अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.

इन्स्पायर अवार्ड प्रदर्शन उद्घाटन समारंभ व पारितोषिक वितरण आणि समारोप या दोन्हीही कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पूरस्कार प्राप्त चिकुंद्रा येथील सह शिक्षक भैरवनाथ कानडे यानी केले.

या प्रसंगी उत्कृष्ट सूत्रसंचालन केल्याबद्दल प्रशासनाच्या वतीने भैरवनाथ कानडे यांचा ही सन्मान करण्यात आला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सहकार महर्षी कारखान्यामध्ये वाहतूक सुरक्षा नियमासंदर्भात चालक-वाहकांना दिले मार्गदर्शन

## ऊस वाहतूक वाहनांना रिफ्लेक्टर बसवण्याचा कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शंकर नगर अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना गळीत हंगाम २०२५/ २६ सुरू असून याबाबत वाहन व वाहन चालक यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने अकलूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नीरज उबाळे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे यांचे प्रतिनिधी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शितल शिंदे यांनी कारखाना कार्यस्थळावर उपस्थित सर्व वाहतूक करणाऱ्या वाहनाची चालक यांना वाहतूक करत असताना घ्यावयाची दक्षता व काळजी. याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.


त्यांनी ऊस वाहतूक करत असताना होणारे अपघात व याबाबत वाहन चालकांनी घ्यावयाची दक्षता यामध्ये वाहनाचा वेग रिप्लेटरचा वापर योग्य दिशेने वाहन चालवणे वाहनाचा स्टेप रेकॉर्डिंग आवाज नियंत्रित ठेवणे एका ट्रॅक्टरच्या पाठीमागे दोन पेक्षा अदा ट्रॉली न जोडणे वाहन चालवताना मद्यपान मोबाईलवर वापर न करणे क्षमतेपेक्षा जास्त ऊस वाहतूक न करणे विना पॅकिंग वाहन ऊस वाहतूक न करणे वापरलेले इत्यादी वाहतूक बाबत सूचना व मार्गदर्शन केले तसेच आपल्या व इतरांच्या कुटुंबातली असणारी जबाबदारी जाणीव व भावना निर्माण केली या सूचना मार्गदर्शनामुळे कोणत्याही अपवाद होऊन जीवित हानी होऊ नये तसेच गुन्हे दाखले दाखल होऊ नये अथवा इतर इतर आपल्या वाहनाने नुकसान होऊ नये याची काळजी घेतल्याने होणारा मोठा अनर्थ ठरणार आहे.

सदर कार्यक्रम प्रसंगी कारखान्याचे शेती अधिकारी समाधान यांनी उपस्थित पोलीस व परिवहन विभागाचे अधिकारी यांचे स्वागत केले यावेळी त्यांनी कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे कुशल मार्गदर्शनाखाली कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखाना प्रगती पथावर वाटचाल सुरू आहे त्यांच्या शिस्तबद्ध परंपरेनुसार कारखान्याची अपघात मुक्त मात्र नावलौकिकीस असे पात्र असे काम काज सुरू आहे असे सांगितले सहकार महर्षी कारखान्याच्या ऊस वाहतुकीमुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास होऊ नये अथवा अपघात घडू नये येण्याकरता कारखान्याच्या संचालिका कुमारी स्वरूपा राणीचे मोहिते पाटील यांच्या संकल्पनेतून वाहनचालक यांच्यामध्ये सुरक्षेतेची जागृती व्हावी या उद्देशाने या शिबिराची आज कारखान्या स्थळावर आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रम प्रसंगी सहकार महर्षी कारखान्याची ऊस तोडणी वाहतूक कॉन्ट्रॅक्टर मुकादम मोहन चालक-मालक शेती विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे शिबिर झाल्याने वाहन चालकांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले.








## हिंदुसभा रुग्णालय वाचलेच पाहिजे यासाठी लढा देत,हिंदूसभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीच्या माध्यमातून घाटकोपरकर एकवटले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतनभोजः घाटकोपरच्या गोरगरीब जनतेच्या हक्काचे ट्रस्ट चे हिंदुसभा रुग्णालय झालेच पाहिजे,या मागणीसाठी होणाऱ्या या आंदोलनात हिंदूसभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीच्या माध्यमातून घाटकोपर मधील सर्व नागरिक,सर्व राजकीय पक्ष,रुग्णालयात काम करणारे कर्मचारी हे सर्व एकत्र येत हिंदूसभा रुग्णालयासमोर,घाटकोपर रेल्वे स्थानक जवळ,घाटकोपर पश्चिम याठिकाणी गुरुवार दि.२० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६:३० वाजता हिंदूमहासभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीचे प्रमुख आणि घाटकोपर प्रगती मंच चे अध्यक्ष पत्रकार प्रशांत बढे यांच्या नेतृत्वाखाली एकत्र स्वाक्षरी मोहीम घेत आंदोलन,निदर्शने करण्यात आली.यावेळी आंदोलनाची पहिली ठिणगी पेटली.गेली तीन वर्ष तोडून ठेवलेले आणि संशयात्मकरित्या इथले काम थांबवून ठेवण्यात आलेले घाटकोपरचे हिंदूसभा रुग्णालय पुन्हा तत्काळ सुरू करावे.निर्माण कार्याला ही तत्काळ सुरुवात करावी,या रुग्णालयातील सुमारे साडेचारशे मराठी,अनुसूचित जाती जमातीचे तसेच इतर समाजाचे कर्मचारी यांना पुन्हा या रुग्णालयात कामाला घ्यावे,या रुग्णालयाचे नामकरण हे एच जे दोषी हिंदूसभा रुग्णालय असावे, रुग्णालय पूर्णपणे ट्रस्टचे आणि फक्त रुग्णालयच व्हावे,रुग्णालयाचे दर हे पूर्वीप्रमाणेच ट्रस्ट च्या दरात असावे.या प्रमुख पाच मागण्यांसाठी हिंदूसभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीच्या माध्यमातून स्वाक्षरी मोहीम आणि निदर्शने करण्यात आले.हिंदूसभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीच्या या आंदोलनात हिंदसभा रुग्णालयातील कर्मचारी यांची उपस्थिती प्रशंसनीय होती यावेळी रुग्णालयातील सर्व कर्मचारी यांनी त्यांची व्यथा मांडून आंदोलन किती महत्वाचे होते हे निर्दशनास आणून दिले.

या आंदोलनात हिंदूसभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीचे सौ.कांचन प्रशांत बढे-तारी,सुभाष कोकणे,शरद भावे तसेच घाटकोपर प्रगती मंचचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाविकास आघाडीच्या मित्रपक्षांची सोलापूरमध्ये बैठक; आगामी महापालिका निवडणूक एकत्रितपणे लढविण्याचा निर्धार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पार्टी) आणि भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) या मित्रपक्षांची निवडणूक पूर्वतयारीसाठी समन्वय बैठक हॉटेल सिटी पार्क, सोलापूर येथे पार पडली.

बैठकीस माजी आमदार आडम मास्तर, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पार्टी), चे अध्यक्ष महेश गादेकर, माजी महापौर संजय हेमगड्डी, माजी महापौर यु. एन. बेरिया, शंकर पाटील, भारत जाधव, अशोक निंबर्गी सर, च.क शेख, उझच् जिल्हा सचिव युसुफ शेख मेजर, माजी नगरसेवक व्यंकटेश कोंगारी, नलिनीताई कलबुर्गी यांच्यासह तीनही पक्षांचे महत्त्वाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी माजी आमदार आडम मास्तर व प्रकाश यलगुलवार यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते व माजी केंद्रीय मंत्री चंद्रकांत खैरे यांच्याशी मोबाईल द्वारे संवाद साधून महाविकास आघाडीच्या मजबूत ऐक्यावर चर्चा केली. सर्व मित्रपक्षांनी महापालिका निवडणूक एकजुटीने लढविण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला.

बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. लवकरच महाविकास आघाडीच्या सर्व मित्रपक्षांची एकत्रित विस्तृत बैठक होणार असल्याचे काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांनी सांगितले.

## गटविकास अधिकारी यांची डोहोळे ग्रामपंचायतीला भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे गटविकास अधिकारी गोविंद खामकर यांनी भेट देऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अनुषंगाने कामाचा आढावा घेतला. तसेच ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी,विकास कामांची पाहणी केली व स्थानिक समस्यांची माहिती घेण्यासाठी घेतली तर ग्रामपंचायत मध्ये सप्तसूत्री कार्यक्रम अंतर्गत कातकरी समाजाचे नागरिक यांचे बँक खातेबाबत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कॅम्प ला भेट देऊन माहिती घेतली. तसेच जिल्हा परिषद शाळा डोहोळेपाडा येथे प्रत्यक्ष भेट देऊन शाळेची पाहणी केली व शिक्षक,पालक तसेच मुलांसोबत चर्चा केली. गटविकास अधिकारी गोविंद खामकर यांनी



सर्व टिम सोबत ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे कार्यालयासमोर माझी वसुंधरा अभियान बाबत माहिती घेऊन कामाची पाहणी केली तसेच, डोहोळे ग्रामपंचायत हद्दीतील नागरी सुविधा जनसुविधा अंतर्गत पूर्ण झालेल्या कामाची सर्वासमवेत प्रत्यक्ष पाहणी केली.तसेच नवीन मंजुर कामाबाबत माहिती घेतली.विशेष म्हणजे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत गावात सुरु शोषखड्डे कामाची साहेबांमार्फत माहिती घेऊन अभियान काळात पुढे करावयाचा योजना उपक्रम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी डोहोळे ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते नामदेव पायरी येथे श्रीफळ अर्पण करून भाजपचा प्रचाराचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीसाठी नगराध्यक्ष व नगरसेवक यांच्या प्रचाराचा शुभारंभ शुक्रवारी सकाळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते नामदेव पायरी ते श्रीफळ अर्पण करून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी निघालेल्या पद यात्रेमध्ये सोलापूर जिल्हा पालकमंत्री व ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार प्रशांतराव परिचारक अवताडे शुगरचे चेअरमन संजय अवताडे,




यांच्यासह हजारो शहर व भाजप विकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने पद यात्रेत सहभागी झाली होते.

पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीकडे भाजपने लक्ष केंद्रित केले आहे पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीची जबाबदारी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे देण्यात आले आहे. भाजपा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शामल शिरसाठ व ३६ नगरसेवकांच्या प्रचाराचा शुभारंभ पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आला छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून पदयात्रा काढण्यात आली होती व नागरी भाजप व मित्र पक्षाची पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले असल्याने दिसून आले व मोठ्या शक्ती प्रदर्शन करत भाजपने आज प्रचाराचा शुभारंभ केला आहे.

**सामाजिक न्यायाची, संविधानिक मूल्यांची आणि संवेदनशील प्रशासनाची उज्ज्वल उदाहरण**

# एससी, एसटी अंतर्गत १४ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ८८९ कुटुंबांना न्याय मिळवून देणारा हात : डॉ. हर्षदीप कांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : एससी/एसटी अंतर्गत १४ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ८८९ मृतकांच्या वारसांना सरकारी सेवेत सामावून घेण्याचा आज महाराष्ट्र शासनाचा ऐतिहासिक निर्णय जाहीर झाला. हा निर्णय केवळ शासनाचा आदेश नाही, तर सामाजिक न्यायाची, संविधानिक मूल्यांची आणि संवेदनशील प्रशासनाची उज्ज्वल उदाहरण आहे.

या लढ्यामागील सर्वात महत्त्वाचे, दूरदृष्टीचे आणि परिणामकारक नेतृत्व म्हणजे सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे साहेब १४ वर्षे थांबलेली न्यायाची वाट आणि एक व्यक्तीचा अथक पाठपुरावा २०११ ते २०२५ या काळात अॅट्रॉसिटीमुळे ८८९ नागरिकांचा मृत्यू झाला, पण त्यांच्या कुटुंबांना कायद्यानुसार मिळायला हवी असलेली सरकारी नोकरी मिळाली नव्हती.

फाईल्स हलत नव्हत्या, प्रकरणे धूळ खात पडली होती, आणि ही कुटुंबे सरकारी कार्यालयात दर दर भटकत होती. त्यामधे महार मांग चांभार आदिवासी ईत्यादी जाती जमातीचे गोर गरीब अत्याचार पीड़ित लोक वाट पाहात होती न्याय कधी मिलेल याची.

या प्रलंबित हक्काला वास्तवाचे स्वरूप देण्याचे धाडस आणि निश्चय डॉ. हर्षदीप कांबळे साहेब यांनी दाखवला.

ते फाईल म्हणजे केवळ कागद नाही, तर दु:ख भोगणाऱ्या कुटुंबांचे भविष्य मानतात यातच त्यांची संवेदना आणि प्रशासकीय प्रामाणिकता दिसते.

**नेतृत्व, नियोजन आणि निर्णायक कृती**

८८९ कुटुंबांना न्याय देण्यासाठी: राज्यस्तरीय समितीची स्थापना, प्रकरणांचा सखोल अभ्यास, धोरणात्मक कागदपत्र तयार करणे, विभिन्न विभागांशी समन्वय, अंमलबजावणीचा स्पष्ट मार्ग तयार करणे महाराष्ट्र शासनाचे विशेष आभार व अभिनंदन हा निर्णय घेतल्याबद्दल.

हे डॉ. कांबळे सर प्रधान सचिव ह्यांच्या प्रयत्नाने घडले. ते प्रशासक म्हणून कठोर, पण अंत:करणाने करुणामय. त्यांची दृष्टी फाईल बंद करण्याची नाही समस्या संपवण्याची.

डॉ. हर्षदीप कांबळे साहेब बाबासाहेबांच्या विचारांचे जीवंत प्रतिबिंब

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक समता, संवेदना, वंचितांसाठी न्याय आणि राज्यघटनावादाचे तत्त्व डॉ. कांबळे साहेबांच्या प्रत्येक निर्णयात झळकते.

हया निर्णयाने .. ते नीती बनवत नाहीत, ते दिशा देतात. ते शासन चालवत नाहीत, ते समाज जोडतात. हा निर्णय म्हणजे त्यांची पदाची शक्ती नव्हे त्यांच्या मूल्यांची, मिशनची आणि सामाजिक बांधिलकीची साक्ष. हा निर्णय नोकरीचा नाही आत्मसन्मानाचा आहे

आज ८८९ कुटुंबांना नोकरी मिळत आहे, पण त्यापेक्षा महत्त्वाचे आहे: संविधानिक हक्काची पुनर्स्थापना दलित-आदिवासी समाजाच्या न्यायलढ्याला दिशा शासनात संवेदनशीलतेची नवी परंपरा

एक वाक्यात न्याय शक्य आहे, जर इच्छाशक्तीअसेल आणि संघर्ष करण्याची हिम्मत असेल डॉ.



हर्षदीप कांबळे साहेब हे त्याचे जिवंत उदाहरण आहेत.

## पान मंगळूर गटातुन रुपाली गायकवाड भाजपाकडून इच्छुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील पान मंगळूर गट हा एस सी महिलासाठी आरक्षित आहे या गटात तडवळ गावचे विध्यमान ग्रा पं सदस्य सौ रुपाली सिद्दार्थ गायकवाड हे भारतीय जनता पक्षाकडून इच्छुक आहेत , गेल्या दहा वर्षांपासून आदरणीय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे कट्टर समर्थक आहेत व आमदार साहेबांच्या नेरुत्वात विविध विकास कामे तडवळ गावात केलेले आहेत, समाज मंदिर , सिमेंट रस्ता , बंधिस्त गटार,फेव्हर ब्लॉक, निराधाराना डोल, घरकुल योजना , शेतकऱ्यला विहीर मंजूर करणे



बी बियाणे असे अनेक योजना तडवळ भागत आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली कोटयावादी निधीचे कामे केले आहेत , यामुळे पान मंगळूर गटात भाजपा कडून प्रमुख दावेदार म्हणून समजले जात आहे .

# ठेकेदारावर कारवाई न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा

## पडघा ग्रामपंचायतीतील बोगस काम प्रकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पडघा ग्रामपंचायत हद्दीतील बालाजी नगर येथे करण्यात आलेल्या भूमिगत गटाराच्या कामातील गंभीर अनियमितता आणि बोगस कामामुळे ग्रामस्थांमध्ये व्यापक नाराजी निर्माण झाली आहे. संबंधित काम ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असून,

> ग्रामस्थांच्या सुरक्षेशी खेळणाऱ्या ठेकेदारांवर कठोर कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. निकृष्ट कामामुळे जनजीवन धोक्यात येत आहे.
> **–पत्रकार कैलास ढमणे**

भ्रष्टाचाराच्या हेतूने काम केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार कैलास ढमणे यांनी केला आहे. गटारावरील चेंबरची झाकणे काम पूर्ण झाल्यापासून तब्बल तीन वेळा बदलावी लागली, हे कामाच्या भयंकर निकृष्टतेचे द्योतक असल्याचे ढमणे यांनी सांगितले. वारंवार झाकणे तुटल्यामुळे चेंबर उघडे पडून अनेक अपघात घडले असून, जीवितहानी होण्याचीही शक्यता निर्माण झाली आहे. तक्रारीनंतर कार्यकारी उपअभियंता, जिल्हा परिषद ठाणे यांनी जागेवर पंचनामा करून हे काम निकृष्ट असल्याचे लेखी नमूद केले आहे. तसेच ग्रामपंचायतीला कामाची दुरुस्ती करून ठेकेदारावर कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, आजपर्यंत ठेकेदारावर कोणतीही कारवाई न झाल्यामुळे संताप व्यक्त करत कैलास ढमणे यांनी १५ दिवसांच्या आत कारवाई न झाल्यास भिवंडी पंचायत समिती येथे बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे. या प्रकरणातून ग्रामपंचायतीच्या कामकाजावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, आगामी काळात प्रशासन कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.






## लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ व दीक्षारंभ कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२५ /२६ मधील प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ व दीक्षारंभ कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सचिन फुगे सर हे लाभले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अमोल शिंदे सर व लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन सर लाभले होते कार्यक्रमातील सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख अतिथी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आणि प्रथम वर्षातील विद्यार्थी प्रतिनिधींच्या हस्ते दीप प्रज्वलन व सरस्वती मूर्ती पूजन पूजन करून करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका निशा फाटे यांनी केले यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक बॅग व घोला पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्राध्यापिका निशा पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दीक्षारंभ कार्यक्रमांतर्गत चित्रपट सादरी करण्याच्या माध्यमातून कृषी व्यवसाय व्यवस्थापन पदवी शिक्षण त्या अंतर्गत विविध अभ्यासक्रम तथा महाविद्यालयाचे विविध अंगी उपक्रम व नवीन शिक्षण धोरण याबाबत जागृत केले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉक्टर अमोल शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वागत समारंभ मुख्य हेतू सविस्तरपणे सांगितला तसेच कृषी व्यवसाय व्यवस्थापन शिक्षणक्रमाचा गाभा सविस्तर उदाहरणासहित समजून दिला व विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये महाविद्यालय नेहमीच अग्रेसर असून त्याकरिता अभ्यासासमवेत, कला, क्रीडा मूल्यशिक्षण, आणि सामाजिक बांधिलकी इत्यादी बाबतीमध्ये देखील महाविद्यालय विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याची त्यांनी नमूद केले. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या आजूबाजूच्या चालू घडामोडी कडे जिज्ञाशो दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे असा सकार मत गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत असे मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य डॉक्टर सचिन फुगे यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच आपसापसातील ऋणानुबंध जोपासले पाहिजेत त्याचबरोबर वरिष्ठ विद्यार्थ्यांचे नव प्रेषित विद्यार्थ्यांचे पारकत्व घेऊन त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी चांगल्या गोष्टीचे मार्गदर्शन केले पाहिजे असे मनोगत व्यक्त केले विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील उपलब्ध सर्व सुविधा सोयी सुविधांचा पुरेपूर वापर करून आवडत्या क्षेत्रात हे संपादन करावे असे या आव्हान देखील त्यांनी केले.

यानंतर विद्यार्थ्यांकरिता सांस्कृतिक आणि मंजूरंजनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सदर कार्यक्रमाच्या मनसोक्त आनंद लुटला व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले व यामध्ये मीच प्रेशर म्हणून गीता सोनवणे यांनी मिस्टर प्रेशर म्हणून आदित्य बोधे मंदार यांनी मान पटकावला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीक्षा तोडकरीने केले या कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी संपन्नतेसाठी द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक विद्यार्थ्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी नवीन उंची गाठावी : आयुक्त डॉ. ओम्बासे यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज कॅम्प प्रशाला येथे भेट देऊन शाळेतील शैक्षणिक उपक्रम, अध्यापन पद्धती, सुविधा व गुणवत्ता यांची सविस्तर पाहणी केली. पाहणीदरम्यान त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांशी थेट संवाद साधत शिक्षण क्षेत्राबद्दल विविध मुद्द्यांची माहिती घेतली.

आयुक्तांनी वर्गनिहाय अभ्यासक्रम, उपस्थिती, अध्यापन तंत्र, तसेच विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांची पाहणी केली. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल जाणून घेतले तसेच अभ्यासात जास्तीत जास्त सहभाग घेण्याचे प्रोत्साहन दिले.



शिक्षकांशी संवाद साधताना आयुक्तांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आधुनिक पद्धती वापरण्याचे, विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तावाढीसाठी सर्जनशील अध्यापनावर भर देण्याचे तसेच प्रत्येक मुलाकडे व्यक्तिगत लक्ष देण्याचे निर्देश दिले.

आयुक्तांनी शाळेतील पायाभूत सुविधा, शिस्त, स्वच्छता, वर्गखोल्यांची स्थिती, उपलब्ध संसाधने यांचेही निरीक्षण केले. शाळेतील वातावरण अधिक प्रेरणादायी राहावे यासाठी आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये दडलेली क्षमता उजाळविणे हे शिक्षकांचे सर्वात मोठे कार्य आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, सृजनशील अध्यापन आणि वैयक्तिक लक्ष या तीन सूत्रांवर शाळांनी काम करावे. विद्यार्थ्यांनी जिज्ञासा, परिश्रम आणि आत्मविश्वास अंगीकारावा. आपली शाळा, आपली मुले आणि आपले भविष्य सक्षम करण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावेत असे आव्हान आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.यावेळी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ सोलापूर प्रशासनाधिकारी मल्हारी माने , पर्यवेक्षक भगवान मुंढे, कॅम्प आवारातील मुख्याध्यापक जगन्नाथ सज्जन , मोसिना मुजावर , रेहाना नदाफ , माहेजबीन मुल्ला , हारुन बंदूकवाले , नाजनीन कोरबू, योगेश रंगम इ . उपस्थित होते .

## विद्यार्थांनी क्रीडा क्षेत्रातही आपले नैपुण्य दाखवावे : दत्तात्रेय जोंधळे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण क्षेत्रामध्ये विविध नाविन्यपूर्ण बदल होत आहेत.हे बदल सर्वांनी स्वीकारणे गरजेचे असून विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास धरून ज्ञानार्जनाबरोबर मोबाईलच्या युगात क्रीडा क्षेत्रातही आपले नैपुण्य दाखवावे असे प्रतिपादन महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे यांनी न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड येथे सदिच्छा भेटीप्रसंगी व्यासपीठावरून केले.

यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,मुख्याध्यापक अशोक शेळके,पुंजाहरी दिघे आदी मान्यवर होते.

पुढे बोलतांना दत्तात्रेय जोंधळे यांनी शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र योगदान देऊन ध्येय निश्चित करून यश साध्य करावे तसेच शाळेत राबविण्यात येणारे विविध उपक्रम,भौतिक सुविधा,शाळेचा उंचावणारा प्रगतीचा आलेख, गुणवत्ता,अध्यापनातील प्रामाणिकता यांबाबत विस्तृत आढावा घेऊनसमाधान व्यक्त केले.

यानंतर आंतरशालेय हिवाळी क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन कार्याध्यक्ष दत्तात्रय जोंधळे,उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे यांच्या हस्ते झाले.यावेळी जोंधळे यांनी विद्यार्थ्यांच्या क्रिकेट सामन्यांचा मनमुराद आनंद घेऊन स्वतः देखील बॅटिंग केल्याने विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होऊन प्रेरणा मिळाली.

याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके,निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे ,संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे,राहुल दवते,वैशाली मोते,सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव,संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे,सुरेश गांगुर्डे, रामदास पवार,नदीम तांबोळी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

### जिल्हा बँकांच्या अस्तित्वाचा प्रश्न गंभीर

### भिवंडीत सहकार नेत्यांची बच्चू कडूंना निवेदन देण्याची तयारी

# कर्जमाफीच्या घोषणेने सहकारी संस्थांवर आर्थिक संकट ? ; कुरुंद सोसायटीची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : राज्य सरकारने शेतकरी कर्जमाफीची मोठी घोषणा केली असली तरी त्याचे परिणाम सहकारी क्षेत्रावर गंभीर स्वरूपात दिसू लागले आहेत. शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा मिळत असताना जिल्हा मध्यवर्ती बँका, प्राथमिक कृषी पतसंस्था आणि सहकारी सोसायट्या आर्थिक संकटाच्या दाराशी पोहोचल्या आहेत. कर्जमाफीमुळे बँकांचे थकीत कर्ज माफ झाले असले, तरी सरकारने माफ केलेल्या कर्जाची रक्कम त्वरित आणि पूर्ण देणे अत्यावश्यक आहे. अन्यथा बँकांचे खेळते भांडवल कमी होऊन त्यांची आर्थिक स्थिती ढासळण्याचा धोका वाढला आहे. कुरुंद ग्रुप वी.का. सेवा सह संस्थेचे चेअरमन भगवान सांबरे यांच्या नेतृत्वाखाली भिवंडीत झालेल्या विचारमंथन बैठकीत ही गंभीर बाब समोर आली. कर्जमाफीची घोषणा होताच बहुतेक शेतकऱ्यांनी कर्जभरणा थांबवला. त्यामुळे सहकारी बँकांची वसुली यंत्रणा



> **भरपाई तातडीने न मिळाल्यास ‘खेळते भांडवल’ थांबण्याचा धोका**

ठप्प झाली असून, सुरू असलेल्या वन टाइम सेटलमेंट (जढड) योजनांवरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. खेळते भांडवल कमी झाल्याने बँकांना नवे पीक कर्ज किंवा इतर कर्ज देणे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे पुढील हंगामात शेतकऱ्यांना सावकारांकडे वळावे लागण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कर्जभरणा न झाल्यास ते कर्ज थेट अनुत्पादक मालमत्ता (छझ) बनते. सरकारकडून वेळेवर निधी न मिळाल्यास बँकांचे एनपीए वाढून त्यांची पत आणि स्थैर्य धोक्यात येते. कर्जमाफी हा राजकीय निर्णय असला तरी, त्याचे सर्वात गंभीर दुष्परिणाम सहकारी अर्थव्यवस्थेवर होतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी दिलासा असला तरी ती बँकांसाठी आर्थिक धोक्याची घंटा ठरू शकते. सरकारने माफ केलेल्या रकमेची १००% आणि तात्काळ भरपाई न केल्यास सहकारी संस्था कोलमडण्याची भीती आहे, असे सहकार क्षेत्रातील एका जाणकाराने स्पष्ट केले. या परिस्थितीत सहकारी संस्थांनी सावरण्यासाठी कर्जमाफीची संपूर्ण रक्कम एकाच हप्त्यात देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. यामुळे बँकांचे खेळते भांडवल पुन्हा वाढून शेतकऱ्यांना कर्जपुरवठा सुरळीत करता येईल.

या संदर्भात लवकरच भिवंडी तालुक्यातील सर्व सहकारी संस्थांचे चेअरमन व पदाधिकारी माननीय नामदार बच्चू कडू यांची भेट घेऊन निवेदन देणार असल्याची माहिती भगवान सांबरे यांनी पत्रकारांना दिली.

## माढ्यात भरणार कृषी व सांस्कृतिक महोत्सव : आमदार अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी



माढ्यात भरणार कृषी व सांस्कृतिक महोत्सव: आमदार अभिजीत पाटील यांनी जपली परंपरा महाराष्ट्रातील प्रसिद्ध अभिनेता व अभिनेत्री तसेच कॉमेडी व महाराष्ट्रातील कर्तबगार कलाकारांना गजबज्ञान माढा शहर

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची चेअरमन भाड्याची लोकप्रिय आमदार अभिजीत आबा पाटील साहेब यांच्या संकल्पनेतून दि. २२ ते रविवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद हायस्कूल वैराग रोड माढा येथे माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सव २०२५ हा भव्यदिव्य स्वरूपात साजरा होणार आहे.

त्यानिमित्ताने आमदार अभिजीत पाटील यांनी कार्यक्रमाची पाहणी करून स्टेज पूजन करण्यात आले यावेळी माढा शहरातील अनेक राजकीय नेते मंडळी उपस्थित होते.

कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान शेतकरी, प्रबोधन, स्थानिक कला सांस्कृतिक जागर मनोरंजन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या उद्देशाने हा महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. या महोत्सवामध्ये अत्याधुनिक कृषी यंत्रसामग्री, बी बियाणे, खते, शेतीपूरक उद्योग दुग्ध व्यवसाय, पशुपालन व इतर व्यवस्थापन कृषी प्रक्रिया उद्योग आदींची प्रदर्शनी भरवण्यात येणार आहेत, शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन सत्रे ,कार्यशाळा, तसेच व्याख्यान व शासकीय योजनेची माहिती. व प्रत्यक्ष लाभ नोंदणी याचाही समावेश असणार आहे.

माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सव २०२५ या महोत्सवाच्या माध्यमातून माढा तालुक्यातील शेती सांस्कृतिक आणि स्थानिक उद्योग व्यवस्थापन नवीन दिशा मिळावी तसेच तरुणाला प्रेरणादायी रोजगार बिमुक संधी उपलब्ध हव्यात हा प्रतिष्ठांच्या मुख्य हेतू आहे या महोत्सवात सर्व शेतकरी बांधव, महिला बचत गट, युवा वर्ग उद्योजक नागरिक व माढा पंचकृतीतील ग्रामस्थ तसेच पाहुण्यांनी मोठ्या संख्येने सहभाग होऊन सदर महोत्सवाचे सौंदर्य वाढवावे असे आव्हान मानेचे आमदार अभिजीत पाटील साहेब आणि विठ्ठल प्रतिष्ठान यांनी केले आहे.